## संक्षिप्त

### अभिजित, सागर उपांत्य फेरीत

**पुणे :** विनायकी क्रीडा महोत्सवाअंतर्गत राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुरुष गटात पुण्याच्या अभिजीत त्रिपणकर आणि सागर वाघमारे यांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला. सनीज वर्ल्ड, पाषाण सुस रोड, पुणे येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत पुरुष गटात पुण्याच्या अभिजीत त्रिपणकर याने ठाण्याच्या कुणाल राऊतचा ९-२३, १३-२, २५-११ असा पराभव केला. पुण्याच्याच सागर वाघमारे याने जळगावच्या संदीप दिवेचे आव्हान २५-४, २५-९ असे संपुष्टात आणले. अन्य उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत जागतिक विजेत्या प्रशांत मोरेने मुंबईच्या निलांश चिपळूणकरचा २५-१६, २२-१५ असा पराभव केला. ठाण्याच्या झैद अहमद याने पुण्याच्या रहिम खान याच्यावर २३-८, १०-१६, २५-० असा विजय मिळवला.

### केवल निर्गुणची वैयक्तिक आघाडी

**पुणे :** सातारा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जलगती मानांकन बुद्धिबळ स्पर्धेत पुण्याच्या केवल निर्गुण याने सातव्या फेरी अखेरीस सात गुणांसह वैयक्तिक आघाडी मिळवली आहे. केवलने सातव्या फेरीत कोल्हापूरच्या अभय भोसलेचा पराभव केला. अन्य पटावर नगरचा आशिष चौधरी आणि कोल्हापूरचा आदित्य सावळकर यांच्यातील डाव बरोबरीत सुटला. दोघांचे ६.५ गुण झाले आहे. साताऱ्याच्या शुभम कांबळेचे देखील ६.५ गुण असून, त्याने सातव्या फेरीत सोलापूरच्या सौरव साहूचा पराभव केला.

### अरिना, नक्षला जेतेपद

**पुणे :** प्लेअर्स चषक पुणे जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत ११ वर्षांखालील गटात अरिना अहमद आणि नक्ष महाजन यांनी विजेतेपद मिळवले. मुलींच्या गटातील अंतिम फेरीत अरिना हिने सनसनाटी निकालाची नोंद करताना द्वितीय मानांकित शगुन गणेशे हिचे आव्हान ९-११, ११-५, १३-११, १६-११, १३-११ असे परतवून लावले. अरिनाने त्यापूर्वी उपांत्य पेरीत अग्रमानांकित शरण्या पटवर्धन हिचा पाच गेममध्ये पराभव केला होता. मुलांच्या गटातील पहिल्या दोन मानांकित खेळाडूंमध्ये झालेल्या अंतिम लढतीत दुसऱ्या मानांकित नक्षने अग्रमानांकित स्वयम कोठावळेचा ११-५, ११-८, ११-८ असा पराभव केला.

## दुसऱ्या डावात जैस्वालचे अर्धशतक; सराव सामन्यात भारताचा विजय

# कर्णधार गिलबाबतच्या चिंता दूर

**वृत्तसंस्था, कोलंबो**

**बोटाच्या दुखापतीमुळे** कर्णधार शुभमन गिलला श्रीलंका एकादश संघाविरुद्धच्या सराव सामन्यातील पहिले दोन दिवस मैदानावर उतरता आले नाही. मात्र, तिसऱ्या दिवशी त्याने फलंदाजी केल्याने आगामी कसोटी मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघाला मोठा दिलासा मिळाला आहे. गिलची (५४ चेंडूंत ४४) शानदार खेळी, त्याला सलामीवीर यशस्वी जैस्वाल (४६ चेंडूंत ६१) याने दिलेली आक्रमक साथ यामुळे भारतीय संघाने तीनदिवसीय सराव सामन्यात सहा गडी राखून विजय मिळवला.

श्रीलंका एकादश संघाने दुसरा डाव ४५ षटकांत ६ बाद २०० धावांवर घोषित करत भारतासमोर विजयासाठी २०७ धावांचे आव्हान ठेवले. भारताने ४५ षटकांत ४ बाद २१४ धावा करत सामना जिंकला. सामन्याच्या अखेरच्या षटकात भारताला विजयासाठी १६ धावांची आवश्यकता होती. त्यावेळी गोलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या मोहम्मद सिराजने फलंदाजीत चमक दाखवली. त्याने अनपेक्षितपणे सलग तीन षटकार ठोकत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. सिराजने अवघ्या १५ चेंडूंत ३२ धावा केल्या. या सराव सामन्याला प्रथमश्रेणीचा सामन्याचा दर्जा प्राप्त नव्हता. पहिल्या दिवशी श्रीलंका एकादश संघाने, तर दुसऱ्या दिवशी भारतीय संघाने ९०-९० षटके फलंदाजी केली. त्यानंतर तिसऱ्या दिवशी दोन्ही संघांना ४५-४५ षटके फलंदाजी करण्याची संधी मिळाली.

पहिल्या डावात शून्यावर बाद झालेल्या सलामीवीर यशस्वी जैस्वालने दुसऱ्या डावात आक्रमक पुनरागमन केले. त्याने केवळ ४६ चेंडूंत ६१ धावांची खेळी करत श्रीलंकेच्या गोलंदाजांवर सुरुवातीपासून दडपण आणले. त्याने कर्णधार गिलसह पहिल्या गड्यासाठी ९० चेंडूंत १०५ धावांची भागीदारी रचली. जैस्वालने अवघ्या ४३ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर संघातील इतर फलंदाजांना सरावाची संधी मिळावी म्हणून निवृत्त झाला.

दुसरीकडे, गिलचे पुनरागमन भारतासाठी सर्वांत मोठी सकारात्मक बाब ठरली. गुरुवारी सरावादरम्यान बोटाला दुखापत झाल्याने तो सामन्याच्या पहिल्या दोन दिवसांत फलंदाजी करू शकला नव्हता. मात्र, तिसऱ्या दिवशी मैदानात उतरून त्याने दुखापतीबाबतच्या चिंता दूर केल्या. त्याने कव्हरमधून लगावलेल्या सलग चौकारांनी तो चांगल्या लयीत असल्याचे संकेत दिले. अखेर फिरकीपटू केशारा नुवान्थाने त्याला बाद केले.

तसेच पहिल्या डावात बेजबाबदार फटका मारून बाद झालेल्या ऋषभ पंतने दुसऱ्या डावात मात्र खेळपट्टीवर ठाण मांडला. अखेर ६८ चेंडूंत २८ धावा करून तो बाद झाला. ध्रुव जुरेल (२० चेंडूंत १७) पुन्हा अपयशी ठरला. शेवटी सिराजने तुफानी फटकेबाजी करत सामन्याचा रोमांच वाढवला. पहिल्या डावात खेळपट्टीवर वेळ व्यतित केलेल्या देवदत्त पडिक्कल आणि केएल राहुल यांनी दुसऱ्या डावात फलंदाजी केली नाही.

### संक्षिप्त धावफलक

- **श्रीलंका एकादश (पहिला डाव) :** ८ बाद ३६३ डाव घोषित
- **भारत (पहिला डाव) :** ६ बाद ३५७ डाव घोषित (देवदत्त पडिक्कल नाबाद ९४२, रवींद्र जडेजा ६३, मानव सुथार ४१; असांका मनोज २/३२)
- **श्रीलंका एकादश (दुसरा डाव) :** ४५ षटकांत ६ बाद २०० डाव घोषित (निशान मदुशंका ६३, निपुन धनंजया ४६; रवींद्र जडेजा २/३३, गुरनूर ब्रार २/३७, मोहम्मद सिराज १/२५)
- **भारत (दुसरा डाव) :** ४५ षटकांत ४ बाद २१४ (यशस्वी जैस्वाल ६१, शुभमन गिल ४४, मोहम्मद सिराज नाबाद ३२, ऋषभ पंत २८; केशारा नुवान्था २/५७)

### सुदर्शनच्या जागी सर्फराजचा समावेश

**नवी दिल्ली :** पायाच्या अंगठ्याच्या दुखापतीमुळे श्रीलंकाविरुद्धच्या कसोटी मालिकेतून बाहेर पडलेल्या साई सुदर्शनच्या जागी मुंबईचा फलंदाज सर्फराज खानची भारतीय संघात निवड करण्यात आली आहे. सुदर्शन सध्या बंगळूरु येथील 'सीओई'मध्ये उपचार घेत आहे. सुदर्शन दुखापतीतून सावरत असून वैद्यकीय पथक त्याच्या प्रगतीवर बारीक लक्ष ठेवून आहे. निवड समितीने त्याच्या जागी श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी बदली खेळाडू म्हणून सर्फराजची निवड केली आहे, असे 'बीसीसीआय'ने आपल्या पत्रकात नमूद केले. पहिला कसोटी सामना १५ ऑगस्टपासून गॉल येथे रंगणार आहे. २८ वर्षीय सर्फराज सहा कसोटी सामने खेळला असून, मुंबईत न्यूझीलंडविरुद्ध तो २०२४ आपला शेवटचा कसोटी सामना खेळला होता. त्याने आतापर्यंत ११ कसोटी डावांत एक शतक आणि तीन अर्धशतके केली आहेत.

# अश्मिता चलिहाचे पहिले विजेतेपद

## कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत बाजी

**वृत्तसंस्था, आसान (कोरिया)**

**भारताच्या २६** वर्षीय अश्मिता चलिहाने रविवारी सर्वोत्तम खेळ दर्शन घडवताना कोरिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ३०० दर्जा) महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. अंतिम लढतीत अश्मिताने चीनच्या चौथ्या मानांकित हान कियान शी हिला १४-२१, २१-१४, २१-१४ असा पराभवाचा धक्का दिला. ही लढत ५३ मिनिटे चालली.

दोन वर्षांपूर्वी याच कोरियात गुडघ्याला झालेल्या दुखापतीमुळे अश्मिताची कारकीर्द धोक्यात आली होती. मात्र, दुखापत आणि त्यामुळे आलेल्या आव्हानांवर मात करताना आसामच्या अश्मिताने कोरिया मास्टर्स स्पर्धा जिंकत कारकीर्दीतील आजवरचे सर्वांत मोठे यश मिळवले. आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाच्या जागतिक मालिकेतील सलग दुसऱ्या स्पर्धेत भारताच्या उदयोन्मुख खेळाडूने महिला एकेरीचे विजेतेपद मिळवले. गेल्याच आठवड्यात तन्वी शर्मा तैवानमधील स्पर्धेची विजेती ठरली होती.

गुवाहाटी येथील राष्ट्रीय क्रीडा प्रबोधिनीत पार्क ताए-सांग यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करणाऱ्या अश्मिताच्या खेळात दुखापतीनंतर मोठे बदल झाले. ''ती आधीपासूनच प्रतिभावान होती. मात्र, रणनीती, तंत्र आणि मानसिकदृष्ट्या तिच्या खेळात काही उणीवा होत्या. त्यावर काम केल्यानंतर तिच्या खेळात मोठी सुधारणा झाली,'' असे पार्क यांनी सांगितले.

अंतिम सामन्यात पहिल्या गेममध्ये अश्मिताने ३-० अशी सुरुवात करत पुढे ९-५ अशी आघाडी घेतली. मात्र, हानने जोरदार पुनरागमन करत गेमच्या मध्याला ११-११ अशी बरोबरी साधली. त्यानंतर चिनी खेळाडूने पहिला गेम सहज जिंकला. अश्मिताने दुसऱ्या गेममध्ये जोरदार प्रत्युत्तर दिले. तिने अधिक आत्मविश्वासाने आक्रमण करत हानला दबावाखाली आणण्यासाठी आपल्या स्मॅशचा प्रभावी वापर केला. गेमच्या मध्याला अश्मिता ११-८ अशी आघाडीवर होती. तिने १७-१० अशी आघाडी घेतल्यानंतर आणखी एका दमदार आक्रमक फटक्यासह २१-१४ असा गेम जिंकत सामना तिसऱ्या गेममध्ये नेला.

निर्णायक गेमच्या सुरुवातीला अश्मिताने ५-२ अशी आघाडी घेतली, पण गेमच्या मध्याला हानने ११-९ अशी आघाडी मिळवली. त्यानंतर अश्मिताने रेषेजवळ अचूक फटके मारत पिछाडी ११-१२ अशी भरून काढली. कोर्टवरील सहज हालचालींच्या जोरावर तिने प्रभाव पाडला. अशाच एका सुरेख हालचालीवर तिने प्रेक्षणीय फटका मारत आघाडी १५-११ अशी वाढवली. अश्मिताने क्रॉस-कोर्ट फटक्यांनी हानला जेरीस आणले. १९-१४ अशी आघाडी घेतल्यानंतर अश्मिताने अचूक खेळ करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

# बसंत मेघवालची 'रुपेरी' भरारी

## उंच उडीत यश; लांब उडीत शाहनवाझला कांस्य

**वृत्तसंस्था, युजीन (अमेरिका)**

**भारताच्या बसंत** कुमार मेघवाल (उंच उडी) आणि शाहनवाझ खान (लांब उडी) यांनी २० वर्षांखालील जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत अनुक्रमे रौप्य आणि कांस्यपदकाची कमाई केली. त्यामुळे भारताने एकाच दिवशी दोन पदके जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. तसेच या स्पर्धेतील उंच उडीत पदक जिंकणारा मेघवाल पहिला भारतीय ठरला.

राजस्थानमधील अनुपगढ या सीमावर्ती गावातील १९ वर्षीय बसंत कुमार मेघवालने उंच उडीत २.२१ मीटरची वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरी नोंदवत रौप्यपदक पटकावले. भारतीय नौदलात कार्यरत असलेल्या मेघवालने यंदाच्या हंगामात आपल्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीत तब्बल १० सेंटीमीटरची सुधारणा केली. मेघवालला भारताची माजी महिला राष्ट्रीय विक्रमवीर उंच उडीपटू सहाना कुमारीचे मार्गदर्शन लाभत आहे.

उंच उडीच्या अंतिम फेरीत अल्जेरियाच्या युनेस अयाचीने सुवर्ण, तर ग्रेट ब्रिटनच्या ओटिस पूल्स कांस्यपदक मिळवले. पदकविजेत्या तिन्ही खेळाडूंनी २.२१ मीटरची उंची पार केली, पण २.२४ मीटरची उंची पार करण्याचे त्यांचे तिन्ही प्रयत्न अपयशी ठरले. त्यामुळे २.२१ मीटरची उंची कितव्या प्रयत्नात पार केली, यावर आधारित 'काउंटबॅक' नियमानुसार अंतिम क्रमवारी ठरवण्यात आली. अयाचीने पहिल्याच प्रयत्नात २.२१ मीटर पार केले. मेघवालने दुसऱ्या, तर पूलने तिसऱ्या प्रयत्नात ही उंची पार केली.

पुरुषांच्या लांब उडीत भारताच्या १८ वर्षीय शाहनवाझ खानने ७.८४ मीटरच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीसह कांस्यपदक जिंकले. त्यामुळे स्पर्धेतील भारताची एकूण पदकसंख्या तीनवर पोहोचली. शाहनवाझने आपल्या तिसऱ्या प्रयत्नात ७.८४ मीटरची सर्वोत्तम उडी नोंदवली. त्याच्या सहा प्रयत्नांची मालिका अनुक्रमे ७.६७, ७.७२, ७.८४, ७.५२, ७.८३ आणि ५.३७ मीटर अशी राहिली.

# दुखापतींसाठी 'सीओई'ला दोष देणे अयोग्य - लक्ष्मण

**वृत्तसंस्था, बंगळूरु**

**भारतीय क्रिकेटपटूंना** वारंवार होणाऱ्या दुखापतींसाठी केवळ 'बीसीसीआय'च्या सेंटर ऑफ एक्सलन्सला (सीओई) जबाबदार धरणे योग्य नाही. खेळाडू म्हणजे यंत्र नव्हे. त्यांना दुखापती होणार आणि पुन्हा तंदुरुस्त होण्यासाठी वेळही लागणार. दुखापतीतून सावरण्यासाठी निश्चित केलेली कालमर्यादा प्रत्येक वेळी पाळली जाईलच असे नाही. त्यामुळे आम्हाला दोष देणे योग्य नाही, असे वक्तव्य 'सीओई'चा प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण याने केले.

गेल्या काही काळात भारतीय क्रिकेटपटूंच्या दुखापतींचे प्रमाण वाढले आहे. त्यातच दुखापतीतून सावरलेल्या खेळाडूंना मैदानात परतण्यासाठी 'सीओई'तील डॉक्टरांनी परवानगी दिल्यानंतर तेच खेळाडू पुन्हा जायबंदी झाल्याचेही प्रकार घडले आहे. त्यामुळे 'सीओई'च्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहे. याच पार्श्वभूमीवर, 'बीसीसीआय'चे अध्यक्ष मिथुन मन्हास आणि सचिव देवजित सैकिया यांनी बंगळूरुतील 'सीओई'ला भेट दिली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत लक्ष्मणने 'सीओई'ची भूमिका, खेळाडू जायबंदी झाल्यानंतर त्याला पुन्हा तंदुरुस्त करण्यापर्यंतची एकंदर प्रक्रिया यावर प्रकाश टाकला.


## शुद्धीपत्रक

**रविवार दिनांक ०९/०८/२०२६** रोजीच्या **लोकसत्तामध्ये पान क्रमांक १०** वर प्रसिद्ध झालेल्या **गाव मौजे दापसरे तालुका वेल्हा जिल्हा पुणे**, या गावाच्या दिलेल्या जाहीर नोटीस मध्ये टंक लेखन चुकीमुळे **गट नंबर ९ ऐवजी ९५ झाले असून त्या ऐवजी मिळकत वर्णनामध्ये गट नंबर ९ वाचण्यात यावा.**

**प्रसाद श्रीराम वाईकर,** ॲडव्होकेट
ऑफीस : शॉप नं. ०३, शिवप्रभू अपार्टमेंट, भुसारी कॉलनी, पुणे – ४११०३८. मो. नं. ८८८८८०२८२

## सार्वजनिक सूचना

(माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण ,मुंबई खंडपीठ, याच्या निर्देशानुसार, दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १०२ अंतर्गत जारी)

**श्री. प्रशांत मधुकर पुप्पल**

**यांच्या कर्जदारांचे लक्ष वेधण्यासाठी**

(मेसर्स एन्व्हिरो बल्क हँडलिंग सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड यांचे वैयक्तिक हमीदार)

याद्वारे सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक **०४ ऑगस्ट, २०२६** रोजी दिलेल्या आदेशान्वये, दिवाळखोरी आणि नादारी संहिता, २०१६ च्या कलम १०० अंतर्गत **श्री. प्रशांत मधुकर पुप्पल** यांच्या विरोधातील दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

| यांच्या कर्जदारांचे लक्ष वेधण्यासाठी | | |
|---|---|---|
| अ.क्र. | तपशील | विवरण |
| १ | कर्जदाराचे/ वैयक्तिक हमीदाराचे नाव | **श्री प्रशांत मधुकर पुप्पल** |
| २ | वैयक्तिक हमीदाराचा पत्ता | प्लॉट क्रमांक ३३२, सेक्टर २७, जनपथ रोड, निगडी प्राधिकरण, पुणे, महाराष्ट्र ४११०४४ |
| ३ | न्याय निर्णय प्राधिकरणाच्या आदेशाचा तपशील | सीपी क्र. (IB) 702/MB/C-III/2023 आणि IA 2518/2025 आदेशाची तारीख ०४/०८/२०२६ |
| ४ | निरवानिरव प्रक्रिया सुरू झाल्याची तारीख | **०४/०८/२०२६** |
| ५ | निवारण व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | **सीएस मंदार वाघ** IBBI/IPA-002/IP-N00450/2017-18/11276 |
| ६ | आय बी बी आय कडे नोंदणीकृत निवारण व्यावसायिकाचा पत्ता व ई-मेल | फ्लॅट क्र. सी - १३०२, ग्रँडस्टँड ट्रिनिटी, वेदभवन ते वारजे सर्व्हिस रोड, पुणे-बंगलुरू महामार्ग, चांदणी चौकाजवळ, पुणे ४११०३८ mandar.wagh@anandchaitanya.com |
| ७ | निवारण व्यावसायिकाशी पत्रव्यवहारासाठी पत्ता व ई-मेल | C/o : आनंद चैतन्य कॉर्पोरेट लीगल ॲडव्हायझर्स एलएलपी, ६०३, ५ वा मजला, व्हेंचर, मॅकडोनाल्ड्सच्या वर, पौड रोड, भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे ४११ ०३८ mandar.wagh@anandchaitanya.com |
| ८ | दावे दाखल करण्याची अंतिम तारीख | **२५/०८/२०२६** |
| ९ | संबंधित अर्ज | "फॉर्म बी" पीजी टू सीडी नियमावलीत वेब लिंक https://www.ibbi.gov.in/home/downloads |

श्री. प्रशांत मधुकर पुप्पल यांचे कर्जदारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी त्यांचे दावे संबंधित पुराव्यासह दिनांक **२५ ऑगस्ट, २०२६** रोजी किंवा त्यापूर्वी, खाली स्वाक्षरी करणाऱ्या निवारण व्यावसायिकाकडे वरील नमूद केलेल्या मुद्दा क्र. ७ मधील पत्त्यावर सादर करावेत. दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून, नोंदणीकृत टपालाद्वारे, स्पीड पोस्टद्वारे किंवा कुरिअरद्वारे सादर केले जाऊ शकतात.

खोटे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास, लागू असलेल्या कायद्याच्या तरतुदींनुसार दंडात्मक कारवाईस पात्र ठरू शकते.

**सीएस मंदार वाघ**
निवारण व्यावसायिक
नोंदणी क्रमांक :-IBBI/IPA-002/IP-N00450/2017-18/11276
AFA वैधता ३१/१२/२०२६ पर्यंत

**स्थळ :** पुणे
**तारीख :** १०/०८/२०२६

## स्थावर मिळकत जाहीर लिलाव / विक्री नोटीस

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ अन्वये)

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम क्र.१०७ अन्वये तमाम लोकास कळविण्यात येते की, कर्जदार **श्री.प्रविण शिवाजी कुसाळकर यांचे जामीनदार १) श्री.अविनाश अरविंद इंदलकर २) श्री.भूषण शांताराम घुले,** वसुली दाखला क्र.३४१/२०२३-२४ दि.२३/०८/२०२३ रोजीचा वसुली दाखला रक्कम रु.२३,५०,६३४/- अधिक पुढील व्याज असे वसुली दाखला मिळालेला असुन ते खाली सही करणार वसुली अधिकारी यांच्याकडे बजावण्यात आला आहे आणि सदर वसुली दाखला आमच्याकडे सोपविला असता कर्जदार व जामीनदार यांना मागणी करूनही कर्जाची संपूर्ण रक्कमेची परतफेड न केल्याने मा.वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था १९६१ चे नियम १०७ अन्वये खालीलप्रमाणे नमुद केलेली कर्जदार यांची तारण स्थावर मिळकत स्थावर जप्ती आदेशाद्वारे जप्त केलेली आहे.

ज्याअर्थी १०७ (११) ड नुसार स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष व खुला ताबा मा.वसुली अधिकारी यांनी दि.०५/०८/२०२५ रोजी घेतलेला असुन वर नमुद केलेले कर्जदार व जामीनदार यांच्याकडून श्रीगणेश सहकारी बँक मर्या. पुणे यांची दि.३१/०५/२०२६ अखेर येणेबाकी खालीलप्रमाणे ;

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | मुद्दल | २१,९३,७३३.०० |
| २ | व्याज | ४,३३,५४०.७१ |
| ३ | इतर खर्च | ६६,०२५.०० |
| ४ | आदेशिकेचा खर्च | १,५०,०००.०० |
| | एकुण | २८,४३,२९८.७१ |

वरील प्रमाणे कर्जदार व जामीनदार यांची एकुण रक्कम रु.२८,४३,२९८.७१/- इतकी रक्कम व दि.०१/०६/२०२६ पासून पुर्ण परतफेड होईपर्यंत त्यावरील व्याज, आदेशिकेचा खर्च व इतर खर्च अशी रक्कम येणे आहे व ती अद्याप वसुल झालेली नाही. त्यासाठी सदर जप्त केलेली मिळकत विक्री करणे गरजेचे आहे. त्या अर्थी मी श्री. ईश्वर धोंडीबा काटे, वसुली व विक्री अधिकारी, पुणे (म.स.स.कायदा १९६० कलम १५६ व म.स.स.नियम १९६१ नियम १०७ प्राप्त अधिकार) खालील नमुद केलेल्या स्थावर मिळकतीची विक्री जशी आहे तशी या तत्वावर जाहीर लिलावाने करण्याचे ठरविले आहे .

**कर्जदार यांच्या स्थावर मिळकतीचा तपशील खालील प्रमाणे**

| कर्जदार नाव | मालमत्तेचे वर्णन | वाजवी मुल्यांकन | लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| श्री.प्रतीण शिवाजी कुसाळकर | १) मौजे मांजरी खुर्द, ता. हवेली, जि. पुणे येथील मिळकत क्र. ०००३४ व ०००३५, स्वयंभु हाईट्स, पहिला मजला, फ्लॅट नं १०१, क्षेत्र ३३८ चौ.फुट कार्पेट + टेरेस क्षेत्र २३ चौ.फुट, असे एकुण कार्पेट क्षेत्र ३६१ चौ.फुट ही मिळकत व | रक्कम रु. २०,२९,५००/- (अक्षरी वीस लाख एकोणतीस हजार पाचशे फक्त) | दि. १७/०९/२०२६ रोजी वार- गुरुवार सकाळी ११.३० वाजता<br>स्थळ: श्रीगणेश सहकारी बँक मर्या. मुख्य कार्यालय स.न.५३/१/बी/२ व १४, विनायक नगर, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे-४११०६१. |
| | २) मौजे मांजरी खुर्द, ता. हवेली, जि. पुणे येथील मिळकत क्र.०००३४ व ०००३५ , स्वयंभु हाईट्स, चौथा मजला, फ्लॅट नं ४०६ , क्षेत्र ३३५ चौ. फुट कार्पेट + टेरेस क्षेत्र २३ चौ.फुट, असे एकुण कार्पेट क्षेत्र ३५८ चौ.फुट ही मिळकत. | रक्कम रु. २०,२२,२६०/- (अक्षरी वीस लाख बावीस हजार दोनशे साठ फक्त) | |

वसुली अधिकारी
(म.स.संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व म.स.संस्था अधिनियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)
द्वारा. श्रीगणेश सहकारी बँक मर्यादित, नवी सांगवी, पिंपळे गुरव, पुणे ४११०६१.

**स्थळ : पुणे**
**दिनांक : १०.०८.२०२६**

## तेलगे प्रोजेक्ट्स लिमिटेड

सीआयएन: L29256PN2018PLC174381
नोंदणीकृत कार्यालय: युनिट नं. ५०२ ए, ५ वा मजला, ओम चेंबर्स, प्लॉट क्र. टी-२९, ३०, ३१, टी ब्लॉक, भोसरी, पुणे, महाराष्ट्र, भारत, ४११०२६ फोन: +९१ ७७५७९५७७९९
ई-मेल: compliance@telgeprojects.com | वेबसाइट: www.telgeprojects.com

### ९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनीच्या सदस्यांची ९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, कंपनी कायदा, २०१३ (त्यानंतर 'कायदा' म्हणून संदर्भित) आणि त्याअंतर्गत तयार केलेले नियम, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने सप्टेंबर २२, २०२५ रोजी जारी केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०३/२०२५ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या लागू तरतुदींनुसार, सूचनेत नमूद केलेले कामकाज पार पाडण्यासाठी, मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हीसी') / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे ('ओएव्हीएम') आयोजित केली जाईल. आम्ही याद्वारे पुढीलप्रमाणे सूचित करतो:

१. आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल आणि ९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, तसेच ई-मतदानाबाबतच्या सूचना (i) अशा सर्व भागधारकांना ईमेलद्वारे पाठवल्या जातील ज्यांचे ईमेल पत्ते कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड (आरटीए) किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट यांच्याकडे नोंदणीकृत आहेत; आणि (ii) ते कंपनीच्या https://telgeprojects.com या वेबसाइट, तसेच स्टॉक एक्स्चेंजच्या म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या आणि बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या www.bigshareonline.com या वेबसाइटवर अपलोड केले जाईल. याव्यतिरिक्त, ज्या भागधारकांनी कंपनी / डिपॉझिटरीज / आरटीए यांच्याकडे त्यांचे ईमेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल पाहण्यासाठी आवश्यक असलेली वेबलिंक असलेले पत्र पाठवले जाईल

२. सभासद केवळ व्हीसी / ओएव्हीएमद्वारेच वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात. वार्षिक सर्वसाधारण सभेत सामील होण्यासंबंधी सविस्तर सूचना ९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत देण्यात येतील. त्यानुसार, कृपया नोंद घ्यावी की कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आणि सहभागी होण्याची कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही.

३. ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्याची पद्धत: **ए.** ज्या व्यक्तीचे नाव डिपॉझिटरीद्वारे ठेवलेल्या सभासदांच्या नोंदवही / लाभधारक मालकांच्या यादीमध्ये अंतिम तारीख म्हणजेच ११ सप्टेंबर, २०२६ पर्यंत नोंदवलेले आहे, तीच व्यक्ती रिमोट ई-व्होटिंग किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान ई-व्होटिंगची सुविधा वापरण्यास पात्र असेल. रिमोट ई-व्होटिंग खालील कालावधीत उपलब्ध असेल

| | |
|---|---|
| रिमोट ई-व्होटिंग प्रारंभ होण्याची वेळ: | शनिवार, १२ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) |
| रिमोट ई-व्होटिंग समाप्तीची वेळ: | सोमवार,१४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) |

**बी.** डीमटेरियलाइज्ड आणि फिजिकल स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या तसेच ज्यांनी आपले ईमेल पत्ते नोंदवले आहेत, अशा भागधारकांसाठी ई-व्होटिंगबाबतच्या सूचना सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिल्या जातील. यासंबंधीचा तपशील कंपनीच्या https://telgeprojects.com या वेबसाइटवरही उपलब्ध करून दिला जाईल. **सी.** ज्या सभासदांनी अद्याप त्यांचे ई-मेल पत्ते नोंदवलेले नाहीत, त्यांना विनंती आहे की, जर शेअर्स डिमटेरिअलाइज्ड स्वरूपात असतील तर त्यांनी ते त्यांच्या डीपीकडे आणि जर शेअर्स फिजिकल स्वरूपात असतील तर कंपनी / आरटीएकडे नोंदवावेत. **डी.** भागधारकांना / गुंतवणूकदारांना ई-व्होटिंगबद्दल काही प्रश्न असल्यास, तुम्ही https://ivote.bigshareonline.com येथे डाउनलोड विभागात उपलब्ध असलेले वारंवार विचारले जाणारे प्रश्न ('एफएक्यू') आणि आय-व्होट ई-व्होटिंग मॉड्यूल पाहू शकता किंवा तुम्ही ivote@bigshareonline.com वर ईमेल करू शकता किंवा १८०० २२ ५४ २२ या क्रमांकावर कॉल करू शकता. याव्यतिरिक्त, सभासद कोणत्याही प्रश्नांसाठी / माहितीसाठी कंपनीला investors@telgeprojects.com वर ई-मेल देखील पाठवू शकतात.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**तेलगे प्रोजेक्ट्स लिमिटेड करिता**
**स्वाक्षरी/-**
**नम्रता विजय बंग**
**कंपनी सचिव सदस्यता क्रमांक A78292**

**स्थळ: पुणे**
**दिनांक: १०/०८/२०२६**

## निडो होम फायनान्स लिमिटेड

nido

**(पूर्वीची एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) नोंदणीकृत कार्यालय : टॉवर 3, पाचवा मजला, विंग बी, कोहीनूर सिटी मॉल, कोहीनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई - 400070. क्षेत्रीय कार्यालय पत्ता : कार्यालय क्र. 407-410, चौथा मजला, काकडे-बिझ आयकॉन, सीटीएस 2687बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजी नगर, पुणे, महाराष्ट्र 411016.**

### ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता) [नियम 8(1)]

ज्याअर्थी **निडो होम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची एडेलवीस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** च्या प्राधिकृत अधिकारींनी वित्तिय मत्तेची